दैनिक

# अट्टल संकेत

ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३०१ ■ शनिवार, दि. २२ फेब्रुवारी २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -301 ■ Saturday, 22 Feb 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## मराठी भाषेकडून राष्ट्राच्या सांस्कृतिक निर्माणाचे महान कार्य -प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

### राजधानीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे दिमाखात उद्घाटन

**नवी दिल्ली - भाषा केवळ संवादाचे माध्यम नसून ती संस्कृतीची संवाहक असते. भाषा समाजातच जन्मतात आणि समाजाच्या निर्मितीत मोठी भूमिका निभावतात. मराठी भाषेने महाराष्ट्रातीलच नव्हे देशातील अनेक महापुरूषांच्या विचारांना अभिव्यक्ती देऊन सांस्कृतिक निर्माणाचे महान कार्य केले आहे, असे गौरवोद्गार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज येथे काढले. भारतीय भाषांमध्ये कधीही वैरभाव नव्हता. येथील सर्व भाषांनी एकमेकांना समृद्ध केले असून भाषिक भेदांपासून दूर राहून भाषा संवर्धित करणे ही सर्वांची सामुहिक जबाबदारी असल्याचे आवाहनही प्रधानमंत्र्यांनी केले.**



नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संमेलनाचे स्वागताध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार, संमेलनाच्या नियोजित अध्यक्षा डॉ.तारा भवाळकर, मावळते अध्यक्ष डॉ.रवींद्र शोभणे, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा प्रा.उषा तांबे, कार्यवाह डॉ. उज्ज्वला मेहेंदळे , कोषाध्यक्ष प्रकाश पागे, संमेलनाचे निमंत्रक संजय नहार आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

साहित्य संमेलनासाठी आलेल्या सर्वांचे मराठीत स्वागत करून प्रधानमंत्री म्हणाले, मराठी साहित्य संमेलन एका भाषेपुरते मर्यादित नाही. त्यास स्वातंत्र्य संग्रामाचा गंध असून तो एक मोठा सांस्कृतिक वारसा आहे. १८७८ पासून देशातील अनेक महान व्यक्तींनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले. या परंपरेशी जोडेले जाण्याचा मला विशेष आनंद आहे. जागतिक मातृभाषा दिनाचे औचित्य साधून होत असलेले संमेलनाचे आयोजन प्रशंसनीय आहे. ज्ञानेश्वरांनी ‘माझ्या मराठाचि बोलू कौतुके, अमृताते पैजा जिंके’ असे म्हटले आहे. मराठी भाषेवर माझे खूप प्रेम आहे. मराठी भाषा शिकण्याचे प्रयत्न मी निरंतर करीत आहे. अशा मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचे काम पूर्ण करण्याची संधी मिळाल्याचे मला मोठे समाधान आहे, असेही श्री मोदी यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याला ३५० वर्ष, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे ३०० वे जयंती वर्ष आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या राज्यघटनेचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे केल्याच्या पार्श्वभुमीवर हे संमेलन होत आहे, असे सांगून पंतप्रधान म्हणाले, १०० वर्षापूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली होती. वेदापासून विवेकानंदांपर्यंत नव्या पिढीला पोहोचविण्याचा संस्कारयज्ञ या माध्यमातून चालविला जात आहे. संघाच्या माध्यमातून मराठी भाषा आणि परंपरेशी जोडले जाण्याची मला संधी मिळाली. मराठी एक परिपूर्ण भाषा असल्याचे स्पष्ट करताना प्रधानमंत्री म्हणाले, मराठीत शुरतेसोबतच वीरता देखील आहे, सौंदर्य आणि संवेदना दोन्ही आहेत, समानता आणि समरसता आहे, मराठीत अध्यात्म आणि आधुनिकताही आहे. शक्ती, भक्ती आणि युक्तीदेखील आहे. देशाला आध्यात्मिक ऊर्जेची गरज असतांना महाराष्ट्राच्या थोर संतांनी ऋषींचे ज्ञान मराठीत जनतेसमोर ठेवले. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, रामदास, संत गाडगे महाराज, तुकडोजी महाराज, गोरा कुंभार आदी अनेक संतांनी भक्ती आंदोलनाच्या माध्यमातून समाजाला नवी दिशा दिली. आधुनिक युगात ग.दि.माडगुळकर आणि सुधीर फडके यांच्या गीत रामायणाने समाजावर प्रभाव टाकला आहे.

गुलामीच्या शेकडो वर्षाच्या कालखंडात मराठी भाषा आक्रमणकर्त्यांपासून मुक्तीचा जयघोष बनली. छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज आणि बाजीराव पेशव्यांसारख्या वीरांनी शत्रूंना मागे सारले. स्वातंत्र्य संग्रामात वासुदेव बळवंत फडके, लोकमान्य टिळक, वीर सावरकरांनी इंग्रजांची झोप उडवली. मराठी साहित्याने देशप्रेमाची धारा प्रवाहीत झाली. या साहित्याने देशप्रेमाचा जागर केला, जनतेला नवी ऊर्जा दिली. अशा शब्दात मराठीची महती व्यक्त करून पंतप्रधान म्हणाले, मराठी साहित्याने समाजातील वंचित, शोषितांसाठी मुक्तीचे दरवाजे खुले करण्याचे कार्य केले. महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षि कर्वे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर अशा अनेक मराठी समाजसुधारकांनी नवा विचार देण्यचे कार्य केले. मराठी भाषेने समृद्ध दलित साहित्य देण्याचे कार्य केले. मराठी भाषेने प्राचीन विचारांसोबत विज्ञानही मांडले. महाराष्ट्र ाने प्रागतिक विचार स्विकारले. मुंबई देशाची आर्थिक राजधानी बनली आहे. मुंबईने मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीला पुढे नेले.

देशाची भाषिक विविधता आपल्या एकतेचा मजबूत आधार असून मराठी याचे उत्तम उदाहरण असल्याचे सांगताना प्रधानमंत्री म्हणाले, भाषा एखाद्या आईप्रमाणे मुलांना नवा विचार देते, विकासाशी जोडते, भेद करीत नाही. भाषेने माणूसकीच्या विचारांना अधिक व्यापक केले आहे. मराठीने इतर भाषेतून साहित्य स्विकारले आणि त्या भाषांनाही समृद्ध केले. अनेक चांगल्या रचनांचे मराठीत भाषांतर झाले आणि मराठीतीतील उत्तम साहित्याचे इतर भाषात भाषांतर झाले. भाषांनी स्वत: सोबत इतरांना समृद्ध केले. हा समरसतेचा प्रवाह आणखी पुढे नेण्याची गरज आहे.

मराठीसोबत सर्व प्रमुख भाषेतून उच्च शिक्षणाला प्राधान्य देण्यात येत आहे. महाराष्ट्रातील युवक आता मातृभाषेतून उच्च शिक्षण

पान ३ वर

## छत्रपती संभाजी महाराजांबद्दल विकिपीडियावर आक्षेपार्ह माहिती टाकणाऱ्या ४ जणांवर गुन्हा दाखल

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजी महाराजांबद्दलचा विकिपीडियावर असेलला आक्षेपार्ह मजकूर न हटविल्याबद्दल आता महाराष्ट्र सायबर पोलिसांनी चार एडिटर्स विरोधात गुन्हा दाखल केला आहे. विकिपीडियाची कॅलिफोर्नियास्थित असलेल्या नोडल एजन्सी विकिमीडिया फाउंडेशनला नोटीस पाठवून सदर आक्षेपार्ह मजकूर हटविण्यास सांगितले गेले आहे. विकिमीडिया ही स्वयंसेवी संस्था असून त्यांच्याद्वारे विकिपीडियाचे संचलन केले जाते.

महाराष्ट्र सायबर सेलने पाठविलेल्या नोटीसमध्ये म्हटले की, छत्रपती संभाजी म हाराजांबद्दल विकिपीडियावर असलेला मजकूर चुकीचा आणि आक्षेपार्ह असा आहे. यामुळे महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होऊ शकते. मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे सुपुत्र छत्रपती संभाजी महाराज हे भारतात पूजनीय आहेत. त्यामुळे त्यांच्याबद्दलचा चुकीचा मजकूर हटविला जावा. विकिपीडियावरील माहितीमुळे लोकांमध्ये रोष निर्माण होऊ शकतो, असेही या नोटिशीत म्हटले आहे.

**पंतप्रधान मोदींनाही ‘छावा’ची भुरळ; अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या भाषणात केला उल्लेख**

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित ‘छावा’ चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर विकिपीडियावरील चुकीचा मजकूर समोर आला होता. त्यानंतर यावर अधिक रोष निर्माण होऊ नये म्हणून सायबर सेलने नोटीस पाठवून मजकूर हटविण्यास सांगितले. मात्र तीन दिवसात कोणतेही उत्तर मिळाले नाही. त्यानंतर सायबर सेलने चार जणांच्या विरोधात गुन्हा दाखल केला.

**कमाल आर खानने केली होती वादग्रस्त पोस्ट** - बॉलीवूड अभिनेता केआरके म्हणजेच कमाल आर खान याने काही दिवसांपूर्वी विकिपीडियावरील माहिती वापरून वादग्रस्त पोस्ट केली होती. केआरकेने सोमवारी, १७ फेब्रुवारीला केलेल्या एक्सवरील एका पोस्टमध्ये विकिपीडियावरील माहितीचा आधार घेतला होता. ज्यात छत्रपती संभाजी महाराजांबद्दल चुकीच्या व आक्षेपार्ह गोष्टी लिहिल्या आहेत. ‘छावा’च्या प्रदर्शनानंतर केआरकेने केलेली ही वादग्रस्त पोस्ट व्हायरल झाली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माहिती हटवण्याचे आदेश दिले होते.

## दहावीच्या परीक्षेत प्रश्नपत्रिका फुटल्याच्या बातमीसंदर्भात राज्य शिक्षण मंडळाचे स्पष्टीकरण

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्यातर्फे घेण्यात येणारी इ. १० वी ची परीक्षा दि. २१/०२/२०२५ रोजी सुरू झाली आहे. सदरच्या दिवशी सकाळ सत्रात प्रथम भाषेचे पेपर होते, या पेपरच्या वेळी जालना जिल्हयातील जिल्हा परिषद हायस्कूल, बदनापूर ता. बदनापूर जि. जालना येथील परीक्षा केंद्र कमांक ३०५० या केंद्रावर मराठी प्रथम भाषेचा पेपर फुटला असल्याबाबत व यवतमाळ जिल्ह्यातील महागाव व कोठारी या परीक्षा केंद्रांवर मराठी प्रथम भाषा विषयाची प्रश्नपत्रिका मोबाईलद्वारे व्हायरल झाल्याबाबत, तसेच जिल्हा परिषद प्रशाला, तळणी, ता.मंठा, जि.जालना, केंद्र क्रमांक ३४३६ या परीक्षा केंद्रासंदर्भात काही माध्यमांमधून बातम्या प्रसारित झालेल्या आहेत.

त्याअनुषंगाने सदर बातम्यांसंदर्भातील वस्तुस्थिती खालील प्रमाणे

१) जालना जिल्ह्यातील जिल्हा परिषद हायस्कूल, बदनापूर, ता. बदनापूर, जि. जालना येथील परीक्षा केंद्र क्रमांक ३०५० या केंद्रावर पेपर फुटीच्या बातमी संदर्भात सदर केंद्रावर भेट दिली असता जी दोन पाने काही वृत्तवाहिन्यांवर प्रसिद्ध झालेली आहेत त्याअनुषंगाने मराठी (प्रथम भाषा) विषयाच्या मूळ प्रश्नपत्रिकेची छाननी केली असता सदरची दोन पाने ही मूळ प्रश्नपत्रिकेची नसून अन्य खासगी प्रकाशकाने प्रकाशित केलेली दिसून आली तसेच काही हस्तलिखित मजकूराची पानेही आढळून आली, त्यामध्ये प्रश्नपत्रिकेतील काही प्रश्न व त्या प्रश्नांची उत्तरे हस्तलिखितामध्ये आढळून आलेली आहेत. म्हणजे ही प्रश्नपत्रिका फुटलेली नसून गैरमार्ग करण्याच्या दृष्टीने प्रश्नपत्रिकेतील काही प्रश्न व उत्तरे व्हायरल केल्याचे दिसून येते. संबंधित घटनेची गांभिर्याने नोंद घेवून जिल्हा प्रशासनाने याबाबत सविस्तर चौकशी करून त्याचा अहवाल देण्याबाबत व दोषी असलेल्या व्यक्तींवर कारवाई करण्याबाबतच्या सूचना दिल्या आहेत.

२) यवतमाळ जिल्ह्यातील महागाव कोठारी या परीक्षा केंद्रांवर मराठी (प्रथम भाषा) विषयाची प्रश्नपत्रिका मोबाईलव्दारे व्हायरल झाली अशा पद्धतीच्या बातम्या काही वृत्तवाहिन्यांवर प्रसारित झाल्या आहेत. याबाबत संबंधितांकडून सदर घटनेचा सविस्तर अहवाल घेण्यात आला असून संबंधित केंद्रावर प्रश्नपत्रिका फुटलेली नसून गैरमार्ग करण्याच्या दृष्टीने प्रश्नपत्रिका व्हायरल केल्याचे दिसून येते. सदर प्रकरणात दोषी व्यक्तींवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

३) जालना जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्रशाला, तळणी, ता. मंठा, जि.जालना, केंद्र कमांक ३४३६ या परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरू होण्यापूर्वी विद्यार्थ्यांना सोडण्यासाठी पालकांनी परीक्षा केंद्रावर गर्दी केली होती, पोलीसांच्या मदतीने पालकांना परीक्षा सुरू होण्यापूर्वी बाहेर काढण्यात आले सदर परीक्षेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडलेला नाही, असे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमि क शिक्षण मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी स्पष्ट केले आहे.

## मंत्रिमंडळात असताना आरोप झाले तर क्षणात राजीनामा देऊन मोकळं झालं पाहिजे-अण्णा हजारे

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आपली जबाबदारी आणि आपलं कर्तव्य समजून पहिलं राजीनामा देऊन मोकळं झालं पाहिजे. मी बोलतो म्हणजे असंच हवेत बोलत नाही. माझं आता ९० वर्ष वय झालं. ९० वर्षांच्या या जीवनात माझ्यावर थोडासा सुद्धा डाग नाही, असं जीवन जगलं पाहिजे. असंच वर्तन मंत्रिमंडळातील लोकांचं असलं पाहिजे. वास्तविक पाहता मंत्रिमंडळात समावेश करतानाच अधिच विचार केला पाहिजे. मंत्रिमंडळात कोणाचा समावेश केला पाहिजे आणि कोणाचा समावेश केला नाही पाहिजे हे आधीच ठरवले पाहिजे. मात्र, हे सुरुवातीला हे चुकतं आणि असं चुकल्यामुळे अशा प्रकारच्या घटना घडतात. त्यामुळे आमच्या राज्याचं आणि देशाचं नुकसान होतं, समाजाचं नुकसान होतं याचा विचार करणं गरजेचं आहेङ्ख, असं अण्णा हजारे यांनी म्हटलं आहे.

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची काही दिवसांपूर्वी हत्या झाल्याची घटना घडली. या घटनेनंतर राज्यातील राजकारण चांगलंच ढवळून निघालं. या घटनेवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपाचं राजकारण सुरु आहे. तसेच खंडणी प्रकरणातील



आरोपी वाल्मिक कराड हा मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय असल्याचा आरोप विरोधक करत आहेत. यावरून मंत्री धनंजय मुंडे यांचा विरोधकांकडून राजीनामा मागितला जात आहे. तसेच भाजपाचे आमदार सुरेश धस आणि सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्या विरोधात अनेक आरोप केले आहेत.

दुसरीकडे मुख्यमंत्री कोट्यातून दिल्या जाणाऱ्या सदनिका बनावट दस्तावेज देऊन लाटल्याच्या प्रकरणात कृषीमंत्री डॉ. माणिकराव कोकाटे यांना प्रत्येकी दोन वर्षाचा कारावास आणि ५० हजार रुपये दंडाची शिक्षा झाल्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. यावरून चांगलंच राजकारण तापलं. दरम्यान, या सर्व घडामोडींबाबत आज ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी सूचक भाष्य केलं. मंत्रिमंडळात असताना जेव्हा आरोप होतात तेव्हा एक क्षण सुद्धा पदावर राहणं चुकीचं आहे. लगेच राजीनामा देऊन मोकळं झालं पाहिजेङ्ख, असं अण्णा हजारे यांनी म्हटलं आहे.

**अण्णा हजारे काय म्हणाले?** - कोणताही नेता असेल मंत्रिमंडळात सहभागी झाल्यानंतर आणि जे लोक मंत्रिमंडळात सामील होतात त्यांनी आपल्या जीवनाचा आदर्श ठेवला पाहिजे. आदर्श ठेवतांना आपले विचार, आचार शुद्ध ठेवले पाहिजेत. जीवन निष्कलंक ठेवलं पाहिजे. जीवनात त्याग ठेवला पाहिजे. जनतेसमोर हा आदर्श ठेवला तर जनता त्यांचं अनुकरण करते. पण मंत्रिच जर वाट सोडून चालायला लागले तर जनता कुठे जाईल? देश कुठे जाईल? याचा विचार करणं गरजेचं आहे. मंत्रिमंडळात असताना जेव्हा आरोप होतात तेव्हा एक क्षण सुद्धा पदावर राहणं चुकीचं आहे. लगेच राजीनामा देऊन मोकळं झालं पाहिजे. चूक झाली ना? लोक पाहतात ना? तर पदावर राहण्याची आवश्यकता नाही, असं अण्णा हजारे यांनी म्हटलं आहे.

## स्पोर्ट्स बाइकच्या धडकेत माजी नगरसेवक वीरकर यांचा मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**



बुलेट दुचाकी व स्पोर्ट्स बाइकच्या धडकेत माजी नगरसेवकाचा मृत्यू झाला. चिकलठाणा एमआयडीसीतील ब्रँडी कंपनीसमोर गुरुवारी (२० फेब्रुवारी) रात्री ११ वाजेच्या सुमारास अपघात झाला. यात भाजपचे गुलमोहर कॉलनी येथील माजी नगरसेवक अशोक गोरखनाथ वीरकर (५५, रा. गुलमोहर कॉलनी) यांचा मृत्यू झाला, तर स्पोर्ट्स बाइकवरील शेख अमान शेख इरफान (१८) आणि शेख शब्बीर शेख अतिक (१८) हे गंभीर जखमी झाले. याप्रकरणी एमआयडीसी सिडको ठाण्यात गुन्हा करण्यात आला. अशोक वीरकर बुलेट (एम एच २० जीएल २१२२) वरून उत्तरानगरीकडे जात होते, तर यामाहा एफझेड (एमएच २० एचए ४४६८) दुचाकीने त्यांना समोरून जोरदार धडक झाली. दोन्ही वाहनांचा वेग प्रचंड होता. एकानेही हेल्मेट परिधान केलेल नव्हते. त्यामुळे वीरकर या धडकेत वीरकर गंभीर जखमी झाले व त्यांना घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांना डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.

## साहित्याच्या उंचीने राष्ट्राची प्रगती

दिल्लीत १९५४ मध्ये अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले होते. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू हे त्या संमेलनाचे उद्घाटक होते; तर स्वागताध्यक्षाची जबाबदारी काकासाहेब गाडगीळ यांच्यावर होती. या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी जबाबदारी पार पाडली होती. हे साहित्य संमेलन महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या अगोदर झाले होते. त्यानंतर ७० वर्षांनी पुन्हा २१ ते २३ फेब्रुवारी रोजी दिल्लीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनाचे उद्घाटन काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ साहित्यिक तारा भवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या या संमेलनाचे स्वागताध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार आहेत. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यानंतरचे हे पहिलेच संमेलन होते आहे. त्यामुळे या संमेलनात नेमके काय चिंतन घडणार याची मराठी रसिकांना आणि साहित्यप्रेमींना निश्चितच उत्सुकता आहे. गेल्या काही वर्षांपासून अधूनमधून मराठी संमेलन राज्याच्या सीमा पार करू लागले आहे, ही स्वागतार्ह बाब आहे. पण केवळ संमेलनांनी सीमा पार करुन मराठीला आणि मराठी साहित्याला समृद्धी लाभणार नाही. साहित्य व्यवहार आणि भाषा समृद्धीकरिता जमिनी स्तरावर प्रयत्न होणे गरजेचे आहे. साहित्य संमेलन हा भाषेचा, साहित्य सारस्वतांचा उत्सव आहे. यानिमित्ताने भाषेच्या भविष्याची चिंताही व्यक्त व्हायला हवी आणि भाषेच्या भविष्याच्यादृष्टीने पावले पडण्याची गरज आहे. केवळ औपचारिक स्वरुपात हा उत्सव होणार असेल तर भाषिक समृद्धतेचा प्रवास घडण्याची शक्यता नाही.

१९५४ मध्ये पार पडलेल्या संमेलनाचे उद्घाटक म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केलेले भाषणातील चिंतन वर्तमानात प्रत्येक भाषिकाला आरसा दाखवणारे आहे. भारतीय लेखकांनी भाषाभाषांच्या मोठेपणांवरून एकमेकांशी वाद घालण्यात शक्ती खर्च करण्यापेक्षा, भारतीय भाषा अधिक समृद्ध करण्याकडे लक्ष द्यावे ही त्यांची अपेक्षा वर्तमानातही कायम आहे. आज भाषिक अस्मितेचा विचार अधिक प्रबळ आणि काही वेळा टोकदार होत आहे. भाषिक अस्मिता असणे चुकीचे नाही, पण तिला दुसऱ्या भाषेच्या तिरस्काराची किनार असता कामा नये. त्याऐवजी आपल्या भाषेतील मर्मस्थळे, गोडवा, मराठी साहित्यातले मौलिक विचार, भाषेची समृद्धता यांविषयी अन्य भाषिकांमध्ये गोडी कशी वाढेल यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. खरंतर भाषा ही संवादासाठीचे माध्यम आहेच, मात्र त्याचवेळी भाषेने समाज एकसंघ राखण्याचे काम करण्याची गरज आहे. त्यामुळे भाषेचा मोठेपणा मिरवत संघर्ष करण्यात शक्ती वाया घालवण्यापेक्षा भाषा समृद्ध होण्याकरिता अधिकाधिक प्रयत्न करण्याची गरज आहे.

जगातील भाषांचा इतिहास आपण जाणून घेण्याचा प्रयत्न केला तर कोणतीही भाषा विकसित होते ती, स्वतःच्या सामर्थ्याने. हे सामर्थ्य आपण जोपासण्याचा प्रयत्न केला तरच भाषा समृद्धतेचा प्रवास घडण्याची शक्यता आहे. यासाठी भविष्यकालीन योजनांची आखणी करुन पावले टाकण्याची गरज आहे. अन्यथा केवळ भाषेचा अभिमान बाळगत राहिल्यास काळाच्या प्रवाहासोबत ती टिकत नाही हे लक्षात घ्यायला हवे. भाषेचे श्रेष्ठत्व जगापुढे मांडण्याचे, ठसवण्याचे काम त्या त्या भाषेचे साहित्यिक करत असतात. कारण त्या भाषेतील वाङ्मय ही अधिक महत्त्वाची गोष्ट आहे. एखाद्या भाषेचे साहित्य किती दर्जेदार निर्माण होते हे अधिक महत्त्वाचे आहे. राष्ट्राच्या प्रगतीत साहित्याचा वाटा नेहमीच मोलाचा असतो. वाङ्मयीन व्यवहारांअभावी लोक बौद्धिकदृष्ट्या कुंठित होत असतात. समाज जेव्हा बौद्धिकदृष्ट्या कुंठित होतो तेव्हा समाज व राष्ट्राची प्रगती देखील कुंठित होत असते. त्यामुळे जगाच्या पाठीवर साहित्याच्या वाटा चालणाऱ्या राष्ट्रातील समाज प्रगत झालेला आपणास अनुभवास येतो आहे. त्यामुळे केवळ भाषेला शासकीय दर्जा मिळाला म्हणून भाषा श्रेष्ठ ठरते असे घडत नाही. त्या भाषेत किती दर्जेदार साहित्याची निर्मिती होते हे अधिक महत्त्वाचे आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी मोठी प्रतीक्षा करावी लागली; मात्र बऱ्याच कालखंडानंतर अखेर हा दर्जा मिळाला आहे. यामुळे मराठी भाषिकांची जबाबदारी संपली असे होत नाही. उलट आता ती कैकपटींनी वाढली आहे. ती लक्षात घेऊन मराठी साहित्यात अधिक दर्जेदार आणि जागतिक दर्जाच्या साहित्याशी स्पर्धा करू शकेल अशा साहित्याची निर्मिती करण्याची जबाबदारी पेलण्याची गरज आहे. गेल्या काही वर्षांत मराठी प्रकाशन विश्वात वाङ्मय प्रकाशित होत नाही असे नाही; मात्र माणसांची मस्तके बदलू शकेल असे साहित्य किती प्रमाणात प्रकाशित होते आहे? जे होते आहे त्याला किती प्रमाणात प्रतिसाद मिळतो आहे? याचाही शोध घेण्याची गरज आहे. त्यामुळे अशा प्रकारचे साहित्य निर्मितीचे आव्हान पेलण्याची जबाबदारी मराठी भाषिकांवर आणि सारस्वतांवर आहे. उत्तम वाङ्मयीन व्यवहाराची गरज वारंवार अधोरेखित होते आहेच, ते व्यवहार गेले काही वर्षे वाढत आहेत का? याचाही शोध घेण्याची गरज आहे.

# प.पू.गाडगेबाबा : एक थोर समाज सुधारक!

**(२३ फेब्रुवारी: गाडगे महाराज जयंती सप्ताह विशेष)**

संतशिरोमणी गाडगे महाराज हे ईश्वर कशात आहे, ही नेमकी जाणीव असलेले संत आणि गोरगरीब, दीनदलित यांचा ऐहिक व आध्यात्मिक विकास होण्यासाठी अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता यांचे उच्चाटन करण्यासाठी तळमळीने कार्य करणारे होते. तीर्थी धोंडापाणी देव रोकडा सज्जनीं' असे सांगत दीन, दुबळे, अनाथ, अपंगांची सेवा करणारे थोर संत म्हणजे गाडगेबाबा. माणसात देव शोधणाऱ्या या संताने लोकांनी दिलेल्या देणग्यांतील पैशातून रंजल्या-गांजल्या, अनाथ लोकांसाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी धर्मशाळा, अनाथालये, आश्रम, व विद्यालये सुरू केली. रंजले-गांजले, दीन-दुबळे, अपंग-अनाथ हेच त्यांचे देव. या देवांतच गाडगेबाबा अधिक रमत असत. त्यांच्याबद्दल महत्वपूर्ण ज्ञानवर्धक संकलित माहितीचा संत चरणधूळ: बापू- श्रीकृष्णदास निरंकारीजींचा सदर लेख चोखंदळ वाचकांच्या सेवेत... संपादक

गाडगे महाराजांचा जन्म दि.२३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील ता.दर्यापूर, शेंडगाव येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर होते. ते त्यांच्या आईच्या माहेरी- मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे त्यांच्या मामाकडेच त्यांचे बालपण गेले. त्यांच्या मामाची बरीच मोठी शेतजमीन होती. लहानपणापासूनच त्यांना शेतीत रस होता, विशेषतः गुरांची निगराणी करायला त्यांना फार आवडे. त्यांचे वडील झिंगराजी हे परीट होते. आई सखूबाईने त्यांचे नाव डेबूजी असे ठेवले होते. डेबूजी लहान असतांनाच त्यांचे वडील दारूच्या व्यसनापायी मृत्युमुखी पडले. त्यामुळे घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने लहानपणापासूनच गुरे राखणे, नांगर चालविणे, शेतीवाडी करणे अशी कामे ते करत असत. त्यांना कामाची खूप आवड होती. स्वच्छता हा त्यांचा विशेष गुण होता. डेबूजींचे लग्न लहानपणीच झाले होते. त्यांना चार मुली होत्या. पण ते संसारात फारसे रमले नाहीत. घरदार सोडून अवघ्या समाजाचा संसार सुधारण्यासाठी ते घराबाहेर पडले. डोक्यावर झिंज्या, त्यावर खापराच्या तुकड्याची टोपी, एका कानात कवडी, तर दुसऱ्या कानात फुटक्या बांगडीची काच, एका हातात झाडू, दुसऱ्या हातात मडके असा त्यांचा वेश असे. सन १८९२ साली त्यांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारश्याच्या दिवशी त्यांनी रूढीप्रमाणे दारु व मटणाच्या जेवणाऐवजी गोडाधोडाचे जेवण दिले होते. हा त्या काळातील परंपरेला दिलेला छेद होता, दिलेली बगल होती. गावात कोणाचे काही अडले नडले, कोठेही काही काम करावयाचे असले की, गाडगे महाराज स्वतःहून पुढे येत. सार्वजनिक हिताची कामे सर्व जनांनी एकवटून केली पाहिजेत, हा धडा त्यांनी मिटल्या तोंडी गावकऱ्यांना शिकविला. दिनांक १ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरादाराचा त्याग करून संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन केले, अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडलेला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला



धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवता आपल्या वाटेने निघून जायचे हा त्यांचा खाक्या असायचा. ते सतत एक खराटा जवळ बाळगायचे. अंगावर गोधडीवजा फाटके-तुटके कपडे आणि हातात एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असे. त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणू लागले. ते ज्या गावात जात तो गाव झाडून स्वच्छ करीत. सार्वजनिक स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्त्वे समाजात रुजविण्यासाठी त्यांनी स्वतः सातत्याने सक्रिय राहून जिवापाड प्रयत्न केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अनिष्ट रूढी-परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले. यासाठी त्यांनी कीर्तनाच्या मार्गाचा अवलंब केला. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करून देत असत. त्यांचे उपदेशही साधे, सोपे असत. चोरी करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, देवा-धर्माच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करू नका, जातिभेद व अस्पृश्यता पाळू नका, असे ते आपल्या कीर्तनातून सांगत. देव दगडात नसून तो माणसांत आहे; हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला. ते संत तुकाराम महाराजांना आपले गुरू मानीत. 'मी कोणाचा गुरू नाही, मला कोणी शिष्य नाही' असे ते कायम म्हणत. आपले विचार साध्या भोळ्या लोकांना समजण्यासाठी ते ग्रामीण भाषेचा- प्रामुख्याने वऱ्हाडी बोलीचा उपयोग करत असत. गाडगेबाबांनी संत तुकारामांच्या नेमक्या अभंगांचा मुबलक वापरही वेळोवेळी केला. देवभोळ्या माणसापासून ते शहरी नास्तिकापर्यंत, कोणत्याही वयोगटातील लोकांना गाडगेबाबा आपल्या कीर्तनात सहजपणे गुंतवून ठेवत, आपले तत्त्वज्ञान पटवून देत. त्यांच्या कीर्तनाचे शब्दचित्र उभे करणे माझ्या ताकदीबाहेरचे काम आहे, असे उद्गार बाबांचे चरित्रकार प्रबोधनकार ठाकरे यांनी काढले होते. संत गाडगेबाबांचा दशसूत्री संदेश- गाडगेबाबा प्रबोधन काव्य- 'भुकेलेल्यांना = अन्न, तहानलेल्यांना = पाणी, उघड्यानागड्यांना = वस्त्र, गोरगरीब मुलामुलींना = शिक्षण, शिक्षणासाठी मदत, बेघरांना = आसरा, अंध, पंगू, रोगी यांना = औषधोपचार, बेकार- बेरोजगारांना = रोजगार, पशु-पक्षी, मुक्या प्राण्यांना = अभय, गरीब तरुण-तरुणींचे = लग्न, दुःखी व निराशांना = हिंमत' हा मानवधर्म पाया आहे.

त्यांनी नाशिक, देहू, आळंदी व पंढरपूर या धार्मिक क्षेत्रांच्या ठिकाणी धर्मशाळा बांधल्या, गोरगरीब जनतेसाठी छोटी-मोठी रुग्णालये बांधली, अनेक नद्यांकाठी घाट बांधले, अतिशय गरीब, अनाथ व अपंग लोकांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांची सेवा केली. महाराष्ट्रातील संत परंपरेबाबत 'ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळसें' असे म्हटले जाते. संत गाडगेबाबांच्या कार्यामुळे- 'या भागवत धर्माच्या कळसावर गाडगेबाबांनी २० व्या शतकात कर्मयोगाची ध्वजा चढवली' असे म्हटले जाते. महाराष्ट्रातील समाजवादाचे प्रचंड व्यासपीठ, असे यथार्थ उद्गार आचार्य अत्रे यांनी संत गाडगेबाबांबद्दल काढले आहेत. लोकसेवेच्या या धकाधकीच्या प्रवासातच त्यांचे अमरावतीजवळ वलगाव येथे पेढी नदीच्या पुलाजवळ २० डिसेंबर १९५६ रोजी देहावसान झाले. 'गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला' या भजनाचा प्रसार करणाऱ्या, कर्मयोगावर दृढ श्रद्धा असणाऱ्या या सत्पुरुषाची आणि कर्त्या समाजसुधारकाची समाधी अमरावती येथे आहे. अमरावती विद्यापीठाला संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ असे नाव दिले आहे. गाडगेबांच्या शिकवणीप्रमाणे आजचा खरा रोकडा धर्म आहे! हीच खरी भक्ती व देवपूजा आहे !!

!! थोर समाजसुधारक संतश्रेष्ठ गाडगे म हाराज यांना जयंती सप्ताह निमित्त कोटी कोटी विनम्र अभिवादन !!

– संकलन व शब्दांकन –

संत चरणधूळ: बापू- श्रीकृष्णदास निरंकारी.
द्वारा- श्रीगुरूदेव प्रार्थना मंदिराजवळ,
रा. रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

# मराठी भाषा पुढे न्यायची असेल तर प्रत्येकाला वाचलं पाहिजे

नवी दिल्ली येथे येत्या दि. २१ ते २३ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत आहे. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर देशाची राजधानी नवी दिल्लीत होणारे हे पहिलेच साहित्य संमेलन असून, मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याची पार्श्वभूमी या संमेलनास आहे. समकालामध्ये मराठी साहित्य याबद्दल खूप उलट आणि सुलट चर्चा सर्वत्र ऐकायला मिळते. एकीकडे मराठी वाचक खूप कमी होतात अशी चर्चा होताना दिसते व पुस्तक वाचली जात नाहीत अशी चर्चा होताना दिसते. मराठी भाषेला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला आहे, तरी देखील एक चर्चा मराठी भाषा ही मृत्युपंथाला लागलेली भाषा आहे, अशीही चर्चा काही अभ्यासक करताना दिसतायत. वास्तविक, मराठी साहित्य कोण वाचतं याचा जर आढावा घेतला तर केवळ महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक यांच्या पलीकडे मराठी वाचकांचं फार मोठं जग आहे, आणि या सर्व वाचकांची जर प्रतिक्रिया पाहिली, या पुस्तकांकडे पाहण्याची तर ती अतिशय स्वागतार्ह आहे. म्हणजे अलीकडच्या पाच-दहा वर्षांमध्ये, जर कोरोनाचा काळ सोडला तर मराठी पुस्तकांची निर्मिती आणि प्रकाशनाची संख्या गती अतिशय वेगवान आहे. तितकीच गती ही पुस्तक विक्रीची आहे आणि सर्व स्तरावरती वेगवेगळ्या पद्धतीची पुस्तके वाचणारे वाचकही वाढत आहेत. म्हणजे एखाद्या पुस्तकाची आवृत्ती एका विशिष्ट काळामध्ये २५-२५ वर्षे जात नव्हती, पण अलीकडचं चित्र उलटं आहे. म्हणजे बऱ्याच पुस्तकांची आवृत्ती ही वर्षात-दोन वर्षात संपताना दिसते.

उदाहरण द्यायचं झालं तर शरद बाविस्कर यांची ‌ङ्भूरा कातंबरीङ्क एका वर्षांमध्ये सहा आवृत्त्या गेल्या. अशा पद्धतीने अनेक पुस्तक आहेत की ज्यांची ७००-८००-१००० पुस्तकांची आवृत्ती ही वर्षभरात संपलेली आहे. याचा अर्थ कोणीतरी वाचतय, त्यामुळे वाचणाऱ्यांची संख्या वाढते आहे. दुसरी गोष्ट अशी आहे की जिथं पुस्तक विक्री केंद्र आहेत किंवा प्रदर्शने भरली जातात तिथे मोठ्या संख्येने पुस्तके विकली जात आहेत, आणि ती सर्व प्रकारची पुस्तक विकली जातायेत. शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत सोहळ्याच्या निमित्ताने दरवर्षी ग्रंथप्रदर्शन भरवलं जातं.

या वर्षीचा आढावा घेतला तर अतिशय वैचारिक जी पुस्तक, संशोधनात्मक आहेत, वर्षानुवर्षाच्या मेहनतीने तयार केलेली आहेत, अशी बुद्धिजीवी वर्ग वाचतील अशी पुस्तके देखील शेकड्याने विक्री झालेली आहेत. याचा अर्थ पुस्तक वाचणाऱ्यांची संख्या ही वाढते आहे किंवा अबादित आहे, त्यामुळे चिंता व्यक्त करण्याचं कारण नाही.

वर्गातली मुलं वाचतायत की नाही याबद्दल सर्व्हे केले, असता समाधानकारक उत्तर मिळत नाही किंवा कोरोनाच्या काळानंतर वर्गात विद्यार्थी येण्याची संख्या कमी होते आहे. परिणामी, असं वाटतं की वाचक कमी होतायेत, पुस्तके वाचली जात नाहीत.

पण तसं चित्र नाहीये. विद्यार्थी देखील काही दिवसांनी परततील. काही दिवसातच असं चित्र लक्षात येईल की वर्गा बाहेर राहून हाती काही लागत नाही. किमान वर्गात बसल्यानंतर जे काही ऐकू येतं कानावरती पडतं त्यातूनच व्यक्तीमत्त्वाचा विकास होतो.

हे वर्गात एखादा शिक्षक शिकवू लागल्यानंतर बोलण्याच्या ओघात पाच-पंचवीस पुस्तकांची नावं, लेखकांची नावं, त्यांच्या लेखनाबद्दलची चर्चा येत राहते आणि त्यातूनच वाचक घडतात. ही प्रक्रिया नक्कीच वर्गात सध्या खंडित आहे, पण बाहेर जर आपण सोशल मीडियावरती पाहिलं तर मोठ्या प्रमाणात पुस्तकांची चर्चा होताना दिसते.

जुनी पुस्तक विकत घेणारा एक मोठा वर्ग तयार झालेला आहे, पुस्तक विकणारा वर्ग तयार झालेला आहे, खूप नवीन मुलं पुस्तक विक्रीच्या क्षेत्रामध्ये आलेली आहेत आणि त्यांचे अनुभव खूप उत्तम आहेत. अतिशय उत्तम दर्जाची पुस्तक निर्मितीची देखील प्रक्रिया मराठीमध्ये सुरु झालेली आहे. काही प्रकाशन संस्था अतिशय उत्तम दर्जाची पुस्तक तयार करत आहेत. हे सगळं वातावरण उत्साहवर्धक आहे. वाचक वाढतायेत, पुस्तक संख्या वाढते आहे, लेखक वाढतायेत, अनेक प्रकारचं लेखन मराठीमध्ये येऊ लागलेल आहे. रिपोर्टाज पद्धतीचं, संशोधनात्मक, ललित आणि नवोदित लेखकांमध्ये जर पाहिलं तर अतिशय दमदार अशा कथा लिहिणारे कथाकार, कादंबरीकार, कवी समोर येतायेत आणि ही सगळी गोष्ट अतिशय स्वागतार्ही आहे, उत्साहवर्धक आहे म राठीच्या वाचकांसाठी आणि मराठीच्या वातावरणासाठी फारच आनंदायी अशी गोष्ट आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्ली २०२५

खरंतर सगळ्या मराठी भाषिकांनी, भाषिकांना अभिमान वाटावा अशी एक दैदीपीमान परंपरा संतांची मराठीमध्ये आहे. ज्ञानेश्वरांपासून मराठी संतांनी अतुलनीय असं योगदान दिलेले आहे. म्हणजे प्रत्येक संतांवरती स्वतंत्र पणे बोलता येईल इतकं योगदान प्रत्येकाचं आहे. शिवाजी विद्यापीठाने १८०० पानाचं गाथेचं निरूपण प्रकाशित करून एक वर्ष व्हायच्या आधी ते संपलं. त्याच्या ११०० प्रती विकल्या गेल्या, ही अतिशय महत्त्वाची अशी घटना आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनामील १८०० पानाचं वैचारिक लेखन हातोहात विकलं जातं, तेही विद्यापीठाच्या एका खिडकीमधून. कारण आमची विक्री केंद्र महाराष्ट्रभर नाही आहेत. म्हणजे विद्यापीठामध्ये येऊन विकत घेऊन लोकांनी हे संपवले आणि म्हणून त्याची दुसरी अध्यवत आवृत्ती नुकतीच प्रकाशित झालेली आहे आणि तिचा देखील खप तशाच पद्धतीने चाललेला आहे.

दिल्ली इथं बऱ्याच वर्षांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत आहे, ही खरंतर खूप आनंदाची गोष्ट आहे. म्हणजे मराठी भाषेची वहीवाट इतिहासामध्ये जर शोधली तर या वहीवाटीमध्ये अर्ध्या पेक्षा जास्त भारत येतो. म्हणजे तंजावर पासून दिल्ली पर्यंत अनेक प्रांतांमध्ये एका विशिष्ट काळामध्ये मराठी भाषा ही राजभाषा होती. कालपरवा पर्यंत मध्य प्रदेश मध्ये मराठी भाषा राजभाषा होती.

गोव्यामध्ये राजभाषा होती, महाराष्ट्र तर आहेच पण महादजी शिंदे यांच्या रूपाने दिल्लीमध्ये आपण मराठीचा झेंडा रोवलेला होता आणि मराठी माणसाचे जे कार्य आहे हे कार्य जगा समोर आणण्यासाठी दिल्लीत साहित्य संमेलन होणं खूप महत्त्वाचे आहे.

खरं कारण मराठी साहित्य हे जागतिक दर्जाचे साहित्य आहे. व्यक्तिमत्त्व विकासाची प्रक्रिया ही वाचनामधून होते. आपण नेहमी भाषिक कौशल्यांच्या गोष्टी करतो की भाषिक कौशल्य येण्याचा मार्ग एकमेव मार्ग म्हणजे वाचन हे आहे. म्हणजे चांगलं लिहिता येणे, चांगलं बोलता येणे हे आजच्या काळात फार महत्त्वाची गोष्ट आहे आणि कोण चांगलं लिहितो, कोण चांगलं बोलतो याचा अभ्यास केला तर जो चांगलं वाचतो तो चांगलं बोलतो, चांगलं लिहितो आणि व्यक्तिम त्त्वाच्या विकासामध्ये भाषिक कौशल्य फार महत्त्वाची आहेत आणि ती आत्मसात करण्यासाठी समाजातल्या सर्व स्तरातील लोकांनी वाचनाशी जोडून घेणं खूप म हत्त्वाचं वाटतं. आज वाचन ही व्यक्तिमत्त्व विकासाबरोबर समृद्ध करणारी गोष्ट आहे, समज वाढवणारी गोष्ट आहे, आकलन शक्ती वाढवणारी गोष्ट आहे. त्यामुळे देशाची जर प्रगती व्हायची असेल, आपला देश पुढे न्यायचा असेल, मराठी भाषा पुढे न्यायची असेल तर प्रत्येकाला वाचलं पाहिजे.

**–डॉ. नंदकुमार मोरे**
मराठी भाषा, विभाग प्रमुख

# ॲड. गोरक्ष लोखंडे यांच्या नियुक्तीबद्दल स्वागत

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे यांचा शासकीय दौरा नुकताच छत्रपती संभाजीनगर मध्ये यशस्वीपणे पार पडला. या दौऱ्यावेळी मराठवाडा विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष प्रतिक लोखंडे यांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

नियुक्तीनंतर त्यांनी महाराष्ट्रभर कामांचा धडाका लावला असून, अनेक प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यास सुरवात केली आहे. अनुकंपा तत्त्वावरील अनेक कर्मचाऱ्यांच्या रखडलेल्यांना नियुक्ती देण्याचे



आदेश त्यांनी संबंधितांना दिले आहेत. यावेळी साहिल शेख, पंकज लोखंडे आणि हर्षल राऊत उपस्थित होते.

# राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडून शिवाजी विद्यापीठाचा आढावा




**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राज्यपाल तथा राज्यातील विद्यापीठांचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांनी आज राजभवन मुंबई येथे कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाच्या कामकाजाचा विस्तृत आढावा घेतला. विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के यांनी यावेळी विद्यापीठासंदर्भात विस्तृत सादरीकरण केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, संशोधन व आंतरराष्ट्रीय सहकार्य, विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट, भाषांतर प्रकल्पांतर्गत कार्य, आंतरवासिता कार्यक्रमाची अंमलबजावणी, अध्यापकांची उपलब्धता, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुविधा, क्रीडा सुविधांचा विकास, 'स्वच्छ भारत अभियान' व विकसित भारत उपक्रमांमध्ये विद्यापीठाचा सहभाग, उद्योग क्षेत्राशी सहकार्य आदी विषयांवर यावेळी चर्चा झाली. बैठकीला प्रकुलगुरू प्रा. पी. एस. पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन शाखा अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. डॉ. अजितसिंह जाधव उपस्थित होते.

# दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त संचालक माहिती कार्यालयात अभिवादन



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मराठी वृत्तपत्राचे जनक, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त आज संचालक माहिती कार्यालयात सहायक अधीक्षक प्रविण भानेगावकर यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

प्रदर्शन सहायक राजेंद्र वाणी, कार्यालयातील कर्मचारी दशरथ वानोळे, इंदुबाई गावंडे, पांडुरंग जाधव, शेख अब्दुल रहेमान, अनिल बिरोटे, अशोक सुरडकर, गणेश सुरासे यांनीही बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून यावेळी अभिवादन केले.

# एवेक एस्पॉई फाउंडेशनच्या माध्यमातून शिवजयंती निमित्त वृक्षारोपन कार्यक्रमाचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

एवेक एस्पॉई फाउंडेशनच्या माध्यमातून प्रथमच शिवजंयती निमित्त वृक्षारोपन करण्यात आले . यावेळी या संस्थेच्या अध्यक्षा कु. ॲड. मेघना त्रिभूवन मॅडम तसेच सचिव सोलनिंदा दाभाडे व इतर पदाधिकारी उपस्थित होते. संस्थेच्या अध्यक्षा ॲड. मेघना त्रिभूवन यांनी वृक्षाचे महत्व पटवून देण्यासाठी व मानवी आरोग्य निरोगी रहावे यासाठी पर्यावरण , शुध्द राखण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले असे अध्यक्ष म्हणून समाजाप्रती असलेली भावना व्यक्त केली आणि सचिव सोलनिंदा दाभाडे यांनी संस्थेच्या माध्यमातून समाज हितासाठी असे नवनवीन उपक्रम घेऊन



समाजजागृती करू असे सांगितले. त्या निमित्ताने शिवजयंती निम्मीत्त विधी विभाग , डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले यावेळी पर्यावरणाच्या संबंधाने विधी विभागाचे डॉ. आनंद देशमुख सर , जनसंपर्क समाजसेविका प्रितीबाला भालेराव, ॲड. मेघना त्रिभूवन, विलास त्रिभुवन, सोलानिंदा दाभाडे, उद्धव पवार, सोमिनाथ दाभाडे, सुनील कासेवड, सचिन दाभाडे, कविता अहिरे, मनीष भंडारी तसेच विधी विभागाचे व पाली विभागाचे संशोधक विद्यार्थी यांचीही उपस्थिती होती.

# मराठी भाषेकडून राष्ट्राच्या सांस्कृतिक निर्माणाचे महान कार्य -प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

पान १ वरून

घेवू शिकेल, असे सांगून प्रधानमंत्री म्हणाले, साहित्य समजाचा आरसा असतो. त्यामुळे साहित्य संमेलन, साहित्यिक संस्थांची देशाच्या विकासात महत्वाची भूमिका आहे. मराठीतीत महान विभूतींनी स्थापन केलेले आदर्श आणखी पुढे नेण्याचे कार्य महामंडळ करेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. समाजमाध्यमांद्वारे मराठी साहित्यात योगदान देणाऱ्या युवकांना प्रोत्साहन द्यावे, युवकांच्या स्पर्धांचे आयोजन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

**शिवाजी महाराजांकडून स्वभाषेचा आग्रह आणि अभिमान – फडणवीस**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर हे संमेलन दिल्लीत होणे ही सर्वांसाठी अभिमानाची बाब असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, जगभरातील मराठी माणसांचे स्वप्न या निमित्ताने पूर्ण झाले. परकीय आक्रमकांनी आपल्या भाषेला प्रदुषित करण्याचा प्रयत्न केल्यावर शिवाजी महाराजांनी राजकारभारात मराठीचा उपयोग करण्याचा निर्णय

केला. सर्व फारसी, ऊर्दु शब्द वगळून मराठीचे शब्द आणण्याची परंपरा त्यांनीच सुरू केली. स्वभाषेचा अभिमान आणि आग्रह छत्रपती शिवाजी महाराजांकडूनच आपण शिकलो आहोत. संमेलन होत असलेल्या तालकटोरा स्टेडिअममध्ये १७३७ मध्ये मराठ्यांनी आपली छावणी लावून दिल्ली जिंकली होती. आता आमचा मराठी माणूस आपल्या विचारांनी दिल्ली जिंकणार आहे. विश्व मराठी संमेलनात पु.ल. देशपांडे म्हणाले होते, आपल्या मातृभाषेवर प्रेम करणाऱ्याला माया आणि वात्सल्य समजतं आणि तो दुसऱ्या भाषेवरही प्रेम करतो. मराठी भाषेने असे सर्वांना आपलेसे केले आहे. ती लोकभाषा होऊन, लोकसाहित्य निर्माण झाल्याने मराठी समृद्ध झाली. संतांनी मराठी भाषा अधिक समृद्ध केली. कला, साहित्य, संस्कृती मराठी माणसाच्या ठायी वसलेली आहे. त्यामुळेच वेगवेगळी साहित्य संमेलने महाराष्ट्रात होत असतात, त्यात बोली भाषांना स्थान मिळत असते. दिल्लीतील मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने मराठीची सेवा करण्याची संधी सर्वांना मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. हे अधिवेशन ऐतिहासिक ठरणार असल्याचे सांगून १०० वे अधिवेशनही भव्य स्वरुपात साजरे करण्यात येईल, असेही श्री.फडणवीस म्हणाले.

संस्कृतीचे बलस्थान असणाऱ्या भाषेने माणसे जोडावी – भवाळकर

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन विविध बोलींचे संमेलन आहे आणि पंतप्रधानांना भेट दिलेली विठ्ठलाची मूर्ती ही महाराष्ट्राच्या उदार संस्कृतीचे प्रतिक असल्याचे नमूद करून डॉ.तारा भवाळकर म्हणाल्या, मराठी भाषेचे महत्व संत ज्ञानेश्वर, संत एकनाथांनी मांडले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्य स्थापन करण्यापूर्वी संतांनी त्यासाठी पोषक भूमी तयार केली होती. मराठी भाषा संतांनी टिकवली. भाषा जीवनात असावी लागते. भाषा जैविक गोष्ट असून, ती बोलली तर जीवंत रहाते. महाराष्ट्राला पांडुरंगांचे स्मरण मराठीतून करायला लावणाऱ्या संतांनी मराठी जिवंत ठेवली. ज्या दिवशी आईने पहिली ओवी बाळासाठी म्हटली असेल त्या दिवशी मराठी भाषा जन्माला आली असेल. संतांनी विठ्ठलाशी संवाद साधतांना मराठी भाषेतून साधला. संत खऱ्या अर्थाने पुरोगामी विचाराचे होते. या सर्वांना मिळून मराठी भाषेचे अभिजातपण आले आहे. मराठी बोलीतून पसरली म्हणून शिवाजीमहाराजांना खेड्यापाड्यातून मावळे मिळाले. भाषा हे संस्कृतीचे बलस्थान असते. भाषा ही आपलेपण निर्माण करणारी, जोडणारी गोष्ट असली पाहिजे, तोडणारी नाही. संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड होण्यासाठी स्त्री असण्यापेक्षा गुणवत्त हा महत्वाचा आधार आहे. दिल्लीचे तख्त राखणारा महाराष्ट्र विचारातून, साहित्यातून जीवंत राहिला आहे. साहित्य संमेलनाच्या निमित्ताने प्रेमाचा संदेश दिला जावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

वर्तमान काळात साहित्यिकांवर महत्वपूर्ण जबाबदारी – पवार

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर पहिलेच साहित्य संमेलन दिल्ली येथे होत असून त्याचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होत असल्याबद्दल विशेष आनंद असल्याचे सांगून श्री.पवार यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत घेतलेल्या भूमिकेबद्दल श्री. मोदी यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. ते म्हणाले, संत परंपरेपासूनच सर्वसमावेशक विचार मांडण्याचे काम मराठी साहित्यिकांनी सातत्याने केले. महिला साहित्यिकांच्या योगदानाने मराठी साहित्य समृद्ध झाले आहे. समाजाला मार्गदर्शन करण्याचे काम साहित्यिकांनी केले. साहित्यिकांची जबाबदारी वाढली असून समाजाला समाजसुधारकांच्या विधायक मार्गाने नेण्याचे काम साहित्यिकाने करण्याची आवश्यकता आहे. नव्या पिढीला पुस्तकांशी बांधून ठेवण्यासाठी नव्या माध्यमांचा कल्पकतेने वापर करायला हवा. नव्या पिढीमध्ये साहित्याची गोडी टिकून राहिली तरच साहित्याला भवितव्य असेल. महिलांना अध्यक्षपदाचा मान अधिकाधिक मिळाला तर महिला साहित्यिकांची परंपरा आणखी वेगाने पुढे जाईल. राजकारण आणि साहित्यातील संबंध पूर्वीपासून आहे, ते परस्पराला पूरक आहेत असेही श्री.पवार म्हणाले.

श्री.नहार म्हणाले, दिल्लीतील साहित्य संमेलनाच्या माध्यमातून लेखणी आणि ग्रंथालयाचे महत्व पोहोचविणारे आहे. पंतप्रधानांच्या हस्ते संमेलनाचे होणारे उद्घाटन राज्याच्या इतिहासात सुवर्णाक्षराने लिहिले जाईल. देशाच्या जडणघडणीत महाराष्ट्राच्या सकारात्मक भूमिकेची पायाभरणी करणारे हे संमेलन आहे.

प्रास्ताविकात श्रीमती तांबे यांनी संमेलनाच्या आयोजनाविषयी माहिती दिली. मराठी मनाचं देशाच्या राजधानीशी असलेलं नातं जवळ आणणारं हे संमेलन असल्याचे त्यांनी सांगितले. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून आणि रुकय्या मकबूल यांच्या नवकार मंत्राने कार्यक्रमाची सुरुवात झाली. शमीमा अख्तर यांनी महाराष्ट्र गीत सादर केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमास केंद्रीय राज्य मंत्री प्रतापराव जाधव, विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, लोकसभेचे माजी अध्यक्ष शिवराज पाटील चाकूरकर, विनय सहस्रबुद्धे आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# सेलूत मोफत नेत्र मोतीबिंदू शस्त्रक्रिया व दंत तपासणी शिबीर

सेलू- येथील लायन्स क्लबच्या वतीने रविवार दिनांक २३ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजाता येथील हुमात्मा स्मारकमध्ये मोफत नेत्र, मोतिबिंदू शस्त्रक्रीया व दंतरोग तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती तालुकाध्यक्ष सुयश पटवारी , सचिव डॉ. बाळासाहेब जाधव यांनी दिली.


शिबीरात सहभागी झालेल्या रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करून आवश्यक असल्यास लायन्स आय हॉस्पीटल मध्ये मोतीबिंदू शस्त्रक्रिया व योग्य सल्ला - मार्गदर्शन केले जाणार आहे. शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था मोफत केली जाणार आहे. नेत्र व दंत तपासणी साठी तज्ञ डॉक्टरांची टीम सेलू येथे येणार आहे. तसेच उच्च दर्जाच्या सुविधा असलेल्या लायन्स हॉस्पीटल मध्ये मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. तरी जास्तीत जास्त नागरीकांनी या मोफत नेत्र व दंत तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन लायन्स क्लब च्या वतीने करण्यात आले आहे.

शिबीराच्या यशस्वीतेसाठी उपाध्यक्ष अजित सराफ, सहसचिव डॉ. अनुराग जोगदंड , कोषाध्यक्ष डॉ.शैलेश मालाणी , डॉ. उमेश गायकवाड , डॉ.कैलास आवटे,डॉ. कुंदन राऊत, डॉ. आशिष मेहता,डॉ. परेश बिनायके , दत्तात्रय सोळंके, डॉ. सुदर्शन मालाणी , कुशल तांगडे , अनुप गुप्ता , राजेंद्र सराफ , सागर लोया , बिराजदार आदी परिश्रम घेत आहेत.

# रिपब्लिकन क्रांती दल सामाजिक संघटनेच्या वाळूज महानगर अध्यक्षपदी प्रवीण आव्हाड

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

रिपब्लिकन क्रांती दल सामाजिक संघटनेच्या वाळूज महानगर अध्यक्षपदी प्रवीण आव्हाड यांची नियुक्ती करण्यात आली. संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. अनिल गवळे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. आव्हाड ही मागील अनेक वर्षांपासून शैक्षणिक व सामाजिक चळवळीमध्ये अग्रेसर असून विविध उपक्रमाच्या माध्यमातून समाजाला न्याय देण्याचं आणि एक व्यावसायिक मंच निर्माण करण्यासाठी



सदैव प्रयत्न करत असतात. त्यांच्या या निवडीबद्दल संघटनेचे कार्याध्यक्ष सुरज खाजेकर, जिल्हाध्यक्ष प्रभारी बाबासाहेब बोरुडे, जिल्हा महासचिव अरुण मुगदल, जिल्हा उपाध्यक्ष भूषण वाघ, शहराध्यक्ष जितेंद्र खिल्लारे, उपाध्यक्ष प्रवीण गवळे यांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. आव्हाडांच्या या निवडीबद्दल सर्व स्तरावर अभिनंदन होत आहेत.

# शिर्डीत भिक्षेकरी धरपकड मोहीम, ७२ भिकाऱ्यांवर कारवाई

**राहाता (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शिर्डीतील घडलेल्या दुहेरी हत्याकांड नंतर पोलिस प्रशासन ॲक्शन मोडवर आले असून शिर्डीतील गुन्हेगारी तसेच अवैद्य व्यवसायाच्या कारवाईनंतर आज गुरुवारी सकाळीच पोलीस, शिर्डी नगरपंचायत व साईबाबा संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने भिक्षेकर धरपकड मोहीम शिर्डीत दिवसभर राबविण्यात आली या मोहिमेत ६० पुरुष तसेच १२ महिला असे एकूण ७२ भिकाऱ्यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

गुरुवारी भल्या सकाळपासून अचानक शिर्डी पोलिस, साईबाबा संस्थान व नगरपंचायत यांच्या संयुक्त पथकाने चावडी परिसर,द्वारकामाई,सोळा गुंठे,साई कॉम्प्लॅक्स,दोनशे रूम,बसस्थानक परिसर तसेच इतर भागातून चित्रविचित्र कपडे घालून भाविकांना मागे लागत पैसे आणि खाण्याच्या वस्तूंची मागणी करणाऱ्या तब्बल ७२ भिक्षेकरी महिला व पुरुषांना ताब्यात घेत विविध रिक्षांमधून गोळा करत बसद्वारे शिर्डी पोलिस ठाण्यात नेण्यात आले. या सर्वांना जेवण देऊन त्यांची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे.अशी माहिती शिर्डीचे पोलिस निरीक्षक रणजित गलांडे यांनी दिली.

या भिक्षेकरी लोकांमध्ये शिर्डीतील लोकांनी त्यांच्या वागणुकी नुसार मिश्किल ठेवलेले नावे – अवलिया, दारू पिऊन गाणे गात फिरणारी राणू मंडल..तर कर्णकर्कश शिट्ट्या वाजवत अचानक जमिनीवर लोटांगण घेत कोलांटी उडी मारणारा गुल्लया, दिवसा दारू पिऊन भाईगिरी करत कुठेही झोपून जाणारी चोपडी यांसह बिगारी काम करणारे सुद्धा काहींना आपली व्यथा मांडताना दिसून आले तर त्यात काही भल्या सकाळी फुल्ल झिंगून आपले निर्दोषत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न करत होते अचानक झालेल्या कारवाईने अनेकजण मानसिक धक्क्यात असताना चेहरे उतरून बसलेले असताना मात्र एक तज्ञ भिक्षेकरी इतक्या टेन्शनच्या प्रसंगी निवांत पेपर वाचत बसल्याचे दिसूनआले. तर काहींचे नातेवाईक पोलिस ठाण्याच्या जवळ आपल्या नातेवाईकांना पकडल्याचे कळताच सोडविण्यासाठी कागदपत्रे घेऊन हजर होते.

पुरुष भिकारी- शिर्डी (७), अहिल्यानगर (७), मुंबई (४), संभाजीनगर (९). नाशिक (८ ),पुणे (३), वाशिम (२) जळगाव (३) अकोला (२) बुलढाणा, नांदेड, जालना, बीड, सांगली, सोलापूर, येथील प्रत्येकी एक तर कर्नाटक (३) मध्यप्रदेश (२) बिहार व पश्चिम बंगाल येथील प्रत्येक एक, महिलां- (८) अहिल्यानगर, एक भंडारा, दोन नाशिक, कर्नाटक एक या ठिकाणचे भिक्षेकरी ताब्यात घेण्यात आले.

शिर्डीत येणाऱ्या साईभक्तांना मोठ्या प्रमाणात भिक्षेकर्यांच्या त्रास होत असल्याने भक्तांकडून त्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याने या पार्श्वभूमीवर आज शिर्डी पोलीस, नगरपंचायत व साईबाबा संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने भिक्षेकरी मोहीम राबविण्यात आली या भिक्षेकरांना ताब्यात घेऊन त्यांची वैद्यकीय तपासणी झाल्यानंतर पुरुष भक्षेकर्यांना विसापूर (तालुका श्रीगोंदा) तर महिला भिक्षेकर्यांना चेंबूर (मुंबई) येथील भिक्षेकरी भिक्षेकरी गृहात रवानगी करण्यात येणार आहे. - रणजीत गलांडे, पोलिस निरीक्षक, शिर्डी

# बोलीतून झाला मराठीचा प्रसार - डॉ. तारा भवाळकर

नवी दिल्ली : मराठी भाषेचा प्रसार केवळ लिखाणातूनच नव्हे, तर बोलीतूनही झाला आहे. भाषा ही संस्कृतीचे बलस्थान असते आणि ती समाजाला जोडणारी असावी, तोडणारी नव्हे, असे मत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांनी व्यक्त केले.

डॉ. भवाळकर म्हणाल्या, ङ्गएका स्त्रीने साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होणे हे महत्त्वाचे नाही, तर गुणवत्ता हा मुख्य मुद्दा आहे. संतांनी मराठी भाषा टिकवली आणि ती जिवंत ठेवली. भाषा फक्त ग्रंथांमध्ये साठवून ठेवल्यास तिचा उपयोग नाही, ती बोलली गेली पाहिजे. महाराष्ट्राला पांडुरंगाचे स्मरण करून देणारी हीच मराठी भाषा आहे, ज्याम ुळे छत्रपती शिवाजी महाराजांना गावोगावी मावळे मिळाले.



त्या पुढे म्हणाल्या, ङ्गविठ्ठल-रखुमाई हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत असून, आमच्या उदार संस्कृतीचे प्रतीक आहेत. 'कांदा मुळा भाजी अवघी विठाबाई माझी' असे सांगणारे संत सावता माळी आणि 'माझा मराठीची बोलू कौतुके, परि अमृतातेहि पैजासी जिंक' असे सांगणारे संत ज्ञानेश्वर यांनी मराठी भाषेला जीवंत ठेवले.

# न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँक घोटाळा प्रकरणी तिसरी अटक

मुंबई : न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँक घोटाळा प्रकरणी तिसरी अटक झाली आहे. मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी अभिमन्यू मौन यांना अटक केली. ते डिसेंबर २०२४ पर्यंत बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी होते. मौन यांनी सह-आरोपी हितेश मेहता यांच्याकडून एक कोटी रुपये घेतल्याचा आरोप आहे.

न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँक घोटाळ्यात बँकेचे माजी महाव्यवस्थापक अकाउंट्सचे प्रमुख हितेश मेहता आणि रिअल इस्टेट डेव्हलपर धर्मेश पौण यांना आधीच अटक झाली आहे. आता मुख्य कार्यकारी अधिकारी अभिमन्यू मौन यांना अटक झाली आहे. यामुळे न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँक घोटाळा प्रकरणातील अटकेतल्या आरोपींची संख्या तीन झाली आहे.

मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँक घोटाळ्याशी संबंधित तिन्ही आरोपींना न्यायालयात हजर केले. न्यायालयाने तिन्ही आरोपींना २८ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे.

शुक्रवारी दादर पोलिस ठाण्यात बँकेच्या कार्यवाहक मुख्य कार्यकारी अधिकारी देवर्षी घोष यांच्या तक्रारीवरुन गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणात मुंबई पोलिसांची आर्थिक गुन्हे शाखा तपास करत आहे. न्यू इंडिया कोऑपरेटिव्ह बँकेच्या प्रभादेवी आणि गोरेगाव शाखांमधून १२२ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याप्रकरणी पोलिसांनी अभिमन्यू मौन, हितेश मेहता आणि धर्मेश पौण या तीन जणांना अटक केली आहे. रिझर्व्ह बँकेने न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेवर सहा महिन्यांसाठी आर्थिक निर्बंध लादले आहेत. या निर्बंधांमुळे न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँक नवी खाती उघडू शकत नाही. नव्या ठेवी ठेवून घेऊ शकत नाही. तसेच बँक कोणालाही कर्ज देऊ शकत नाही. बँकेच्या कर्मचाऱ्यांना थकीत कर्जांच्या वसुलीच्या प्रक्रियेची गती वाढवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी शिक्षकांचा कालावधी वाढवण्याचा मुद्दा विधानसभेत मांडणारः आमदार प्रशांत बंब.



**खुलताबाद**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र शासनाने विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्यातून विविध भागात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी म्हणून जिल्हा परिषद शाळेमध्ये काही काळासाठी शिक्षकांची नेमणूक केली होती या शिक्षकांचा कालावधी थोड्या दिवसात संपणार असून तो कालावधी वाढवण्यासाठी गंगापूर खुलताबाद मतदार संघाचे लाडके आमदार प्रशांत बंब यांना मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी शिक्षक यांच्यातर्फे निवेदन देण्यात आले. प्रशांत बंब यांना निवेदन देऊन सविस्तर चर्चा करून प्रशिक्षणार्थ्यांना असा शब्द दिलाय की ३ तारखेला होणा□्या मुंबई येथे विधानच्या सभागृहात तुमचा मुद्दा मांडतो व नक्कीच तुम्हाला कार्यकाल वाढवून देण्यासाठी प्रयत्न करतो.या प्रसंगी अमोल गायकवाड, सुनील खंडागळे, भाग्यश्री गवळी, इमरान शेख,प्रियंका जाधव, स्वप्निल सोनवणे, सोनाली गवळी,पल्लवी ठेंगडे, कविता काळे, प्रियंका बोरुडे सोनाली जाधव.खुलताबाद गंगापूर तालुक्यातील प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

# 'महाकुंभमुळे अर्थव्यवस्थेत ३ लाख कोटींची वाढ'

लखनऊ : महाकुंभमुळे उत्तर प्रदेशच्या अर्थव्यवस्थेत ३ लाख कोटींची वाढ झाली, अशी माहिती उत्तर प्रदेश विधानसभेत मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दिली. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी शुक्रवारी विधानसभेच्या बजेट सत्रमध्ये समाजवादी पक्षावर कडाडून टीका केली. समाजवादी पक्षाच्या आमदार रागिनी सोनकर यांच्या आर्थिक संबंधित प्रश्नावर योगी आदित्यनाथ यांनी उत्तर दिले. मुख्यमंत्री योगी म्हणाले की, उत्तर प्रदेशने १ ट्रिलियन अर्थव्यवस्था बनवण्याचे लक्ष्य ठेवले आहे. भारत ३ नाही तर ५ ट्रिलियन अर्थव्यवस्था बनवण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

# नेत्रदीपक सोहळ्यात रंगला शिवपूजन सोहळा



पुणे : शिवरायांच्या भव्य प्रतिकृतीवर होणारा पुष्पवर्षावः पारंपरिक पद्धतीने काढलेली पालखी मिरवणूकः रॉयल एनफिल्डवर स्वार होऊन बाईकर्सने शिवरायांना दिलेली म ानवंदनाः शेकडो दिव्यांनी केलेली शिवरायांची आरती आणि छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा घोषणा देत जल्लोषपूर्ण वातावरणात शेकडो पुणेकरांच्या उपस्थितीत शिव स्वराज्य यात्रेचा समारोप आणि शिवपूजन सोहळा रंगला.

आम्ही पुणेकर संस्थेच्या वतीने टोकियो येथे उभारण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन आणि भारतातील १३ राज्यातून सुमारे ८ हजार किलोमीटरचा प्रवास केलेल्या शिव स्वराज्य यात्रेचा समारोप गणेश कला क्रीडा मंच येथे झाला. यावेळी एमआयटी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संस्थापक डॉ. विश्वनाथ कराड, भारत इतिहास संशोधक मंडळाचे अध्यक्ष प्रदीप रावत, ज्येष्ठ इतिहास अभ्यासक पांडुरंग बलकवडे,आम्ही पुणेकर संस्थेचे अध्यक्ष हेमंत जाधव उपस्थित होते.

अखिल जपान भारतीय महासंघाचे अध्यक्ष आणि एदोगावा इंडिया कल्चर सेंटर, टोक्योचे संचालक योगेंद्र पुराणिक यांच्या सहकार्याने स्मारक साकारणार आहे. आम्ही पुणेकर आयोजित शिवस्वराज्य यात्रेची दखल घेत लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डच्या वतीने संस्थेचा सन्मान करण्यात आला. २०२३ साली कुपवाडा येथे सैनिकांना स्फूर्ती देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक उभारले.

# शिवराणा वाचनालयात शिवाजी महाराजांची जयंती उत्सवात साजरी



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पुंडलिक नगर येथे रयतेचे राजे तथा स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली याप्रसंगी सर्व उपस्थित नागरिकांनी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले शिवराणा सार्वजनिक वाचनाचे अध्यक्ष एडिटर यांचे यावेळी शिवरायांचा गौरव करणारे भाषण आक्रमक शैलीत झाले सध्याचे महाराष्ट्रातील परिस्थिती बिकट असून गरिबांना न्याय मिळणे कठीण झाले आहे असे ताटू यांनी सांगितले तर दिगंबर बगांळे यांनी शिवराय हे खरे धर्मनिरपेक्ष राजे होते तर देविदास जाधव जयसिंग खोकड यांनी विचार मांडले कार्यक्रमासाठी दुर्गासिंग महेर प्रेमसिंग चुंगडे ,नारायण महेर, संजय मेवाड जादू सिंग महेर, शामसिंगश खोकड ,जितेंद्र निकुंभ, गणेश बोर्डे ,वसंत देशमुख ,संदीप राजपूत, देविदास कोळेकर,गणेश शेजुळ, तर सूत्रसंचालन देविदास जाधव यांनी केले

# देवगिरी महाविद्यालयात दृष्टिहीन १५० विद्यार्थ्यांना सिएसआर निधीमधून स्मार्ट व्हिजन चष्मा वितरण

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

देवगिरी महाविद्यालय येथे दिनांक २१ फेब्रुवारी २०२५ इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड, पूर्व मद्रास रोटरी क्लब, एसएससी टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड आणि हेल्प द ब्लाइंड फाउंडेशन व देवगिरी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दृष्टिहीन विद्यार्थ्यांसाठी प्रोजेक्ट दृष्टी अंतर्गत कार्पोरेट सामाजिक बांधिलकी कार्यक्रमांतर्गत इंडियन ऑइल कार्पोरेशन लिमिटेड च्या वतीने २४ लाख किंमतीचे अंध विद्यार्थ्यांसाठी मोफत १५० स्मार्ट व्हिजन चष्मा वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मशिप्र मंडळ केंद्रीय कार्यकारिणी सदस्य मा.श्री. त्रिंबकराव पाथ्रीकर तर प्रमुख उपस्थितीमध्ये महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मा. श्री. विवेक जयस्वाल उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून श्री. संजीव रंजन वरिष्ठ व्यवस्थापक, इंडियन ऑइल कार्पोरेशन, श्री. इकबाल सिद्दिकी, उपव्यवस्थापक एलपीजी, श्री. म ोहम्मद इब्राहिम एस एच जी टेक्नॉलॉजी, श्री.निवास राव पूर्व मद्रास रोटरी क्लब, श्री. धीरज कुमार वरिष्ठ व्यवस्थापक इंडियन ऑइल, श्री. विशाल लोडगे इंडियन ऑइल पेट्रोल पंप, श्री. दत्तात्रय कडवे सम न्वयक हेल्प द ब्लाइंड फाउंडेशन, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रोफेसर अशोक तेजनकर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. सुदेश डोंगरे यांनी केले. आपल्या प्रास्ताविकामध्ये त्यांनी अंध विद्यार्थ्यांना म हाविद्यालयात आता पर्यंत विविध सॉफ्टवेअर, ब्रेल टाईपराईटर, ध्वनिफिती अभ्यास साहित्य उपलब्ध करून देण्यात येते तसेच दृष्टिहीन विद्यार्थ्यांना सर्वतोपरी मदत करण्यात येते याची माहिती दिली.

छत्रपती संभाजीनगर शहरातील तसेच जालना जिल्ह्यातील दृष्टिहीन विद्यार्थ्यांना पूर्व मद्रास रोटरी क्लब यांच्या प्रयत्नातून इंडियन ऑइल कार्पोरेशन यांच्या सीएसआर फंडातून अंध विद्यार्थ्यांसाठी एस एच जी टेक्नॉलॉजी द्वारा निर्मित स्मार्ट व्हिजन चष्मा वितरित करण्यात आले. सदरील चष्मा हे उपकरण अंध विद्यार्थ्यांसाठी तिसरा डोळा आहे असे प्रतिपादन इंडियन ऑइल कार्पोरेशनचे वरिष्ठ व्यवस्थापक श्री संजीव रंजन यांनी केले. हा चष्मा



ए आय तंत्रज्ञानावर आधारित असून या चष्म्यामुळे दृष्टिहीन विद्यार्थ्यांना समोरील गोष्टींची इत्यंभूत माहिती होणार आहे या चष्मामुळे त्यांना त्या चष्मा मी त्यांना त्यांच्यासमोर असणाऱ्या प्रत्येक गोष्टीची वर्णनात्मक माहिती, दिशादर्शक फलक,तसेच अभ्यास, वाचन इत्यादी करता येणार आहे. या चष्म्यामध्ये १५ वेगवेगळे फीचर्स आहेत, वॉकिंग मोड, इमर्जन्सी मोड आदीमुळे दृष्टिहीन विद्यार्थी स्वतः स्वतःची मदत करू शकतात अशी माहिती एस एच जी टेक्नॉलॉजी उपाध्यक्ष मोहम्मद इब्राहिम यांनी दिली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांना महाविद्यालयाद्वारे विविध सोयी सवलती सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. त्यामध्ये फिस माफी ग्रंथालयामध्ये विशेष कक्ष दिव्यांगासाठी सॉफ्टवेअर ह्या विषयी माहिती दिली. इत्यादी. सुवीधा देण्यात आल्या आहे.

म. शि. प्र. मंडळ व्यवस्थापनाकडून अंध विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा देण्याची भूमिका गेल्या अनेक वर्षापासून असल्याचे प्राचार्यानी सांगितले त्यामुळे आज देवगिरी महाविद्यालयातील अनेक दृष्टीहीन विद्यार्थी वेगवेगळ्या आस्थापनामध्ये यशस्वीपणे सेवारत आहेत, उच्च शिक्षणामध्ये काही विद्यार्थ्यांनी पी.एचडी. सारखी सर्वोच्च पदवी संपादन केली आहे असे प्रतिपादन केले. श्री. इकबाल सिद्दिकी एलपीजी, उपव्यवस्थापक यांनी विद्यार्थ्यांना ए आय तंत्रज्ञानावर आधारित स्मार्ट व्हिजन चष्मा चा वापर विद्यार्थ्यांनी करावा या माध्यमातून अंध विद्यार्थी दुसऱ्यावर अवलंबून राहणार नाहीत असे मत व्यक्त केले. यात चोवीस लक्ष किमतीचे १५० पेक्षा अधिक चष्मे वितरण करण्यात आले त्यामध्ये छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील अंध विद्यार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला. हेल्प द ब्लाईट या चेन्नई ही संस्था देवगिरी म हाविद्यालयातील अंध मुलांना अद्यावत अत्याधुनिक सुविधा केंद्र पुढील काळात उभारणीसाठी मदत करणार असल्याचे समन्वयक दत्तात्रय कडवे यांनी सांगितले.

कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या कार्यशाळेमध्ये श्री. धीरज कुमार, श्री. गणेश खेत्री, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन श्री.विशाल लोडगे इंडियन ऑइल पेट्रोल पंप, श्री. दत्तात्रय कडवे, समन्वयक हेल्प ब्लाइंड फाउंडेशन श्री. मोहम्मद इब्राहिम आदींनी विद्यार्थी आणि पालक यांना मार्गदर्शन केले.

याप्रसंगी विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत अंध विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रवी पाटील, डॉ. अपर्णा तावरे, डॉ. गणेश मोहिते, अनाम प्रेम स्वयंसेवी संस्थेचे श्री. जुगल किशोर मंत्री महाविद्यालयातील कर्मचारीदिव्यांग विद्यार्थी, पालक आणी शिक्षक आणि पालक त्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. राजेश शेषम यांनी केले.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४ ५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४ ३ १ ० ० ५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४ ३ १ ० ० ३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**